# आठवणी लोकमान्यांच्या



प्रकाशक
कार्यवाह, श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्था
केशवजी नाईकांच्या चाळी
(मुंबईतील पहिला गणेशोत्सव)
गिरगांव, मुंबई ४०० ००४

मुद्रक
माधव द० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी
गिरगांव, मुंबई ४०० ००४

प्रकाशन
१ ऑगस्ट २००४
पूनर्मुद्रण
१ ऑगस्ट २००५, सप्टेंबर २००५
नोव्हेंबर २००५, एप्रिल २००६, ऑगस्ट २००८

लोकमान्यांचे रेखाचित्र : व्हि. एन. ओके

www.1stganeshfestival.com



लोकमान्य टिळकांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेकविध पैलू होते. त्यांच्या निधनानंतर स. वि. बापट यांनी 'लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका'चे तीन खंड प्रकाशित केले. त्यात लोकमान्यांच्या अनेक हृद्य आठवणी आहेत. त्या व्यतिरिक्तही काही ग्रंथातून लोकमान्यांच्या संपर्कात आलेल्या अनेक व्यक्तींनी त्यांच्या आठवणी नोंदवल्या आहेत.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून आजही आपल्याला अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आहेत. हाच उद्देश डोळ्यांसमोर ठेवून आम्ही वर उल्लेख केलेल्या पुस्तकांतून काही आठवणी निवडल्या आहेत. लोकमान्यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने त्यांचे हे संकलन आम्ही प्रकाशित करीत आहोत.

प्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ. य. दि. फडके व टिळक चरित्राचे अभ्यासक श्रीनिवास बेळवी यांचे या संकलन कार्यासाठी आम्हांला बहुमोल मार्गदर्शन लाभले. त्यांचेही आम्ही ऋणी आहोत.

कार्यवाह
श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्था
केशवजी नाईकांच्या चाळी

असा काही आशिष द्या या घडीला
महत्कार्य हातून काही घडो
महाराष्ट्रदेशी जन्मास आल्याप्रमाणे
सार्थक जीवाचे काही घडो

— बा. भ. बोरकर

# डॉ. सी. डी. देशमुख

(भारताचे पहिले अर्थमंत्री)

१९१९च्या अखेरीस लो. टिळकांना भेटलो होतो. चिरोल खटल्यासाठी ते इंग्लंडला आले होते. भारताच्या स्वातंत्र्याच्या दृष्टीने काही करता आले तर त्याबद्दल मला त्यांचे मार्गदर्शन हवे होते.

''मी जर आय.सी.एस. प्रविष्ट झालो असलो तरी राष्ट्रीय लढ्यात भाग घेणे माझे कर्तव्य आहे काय?''

''नाही, आपला देश आता खात्रीने लवकरच स्वतंत्र होईल. स्वराज्याचा कारभार चालवण्यासाठी अनुभवी शासनकर्ते लागतीलच. तुम्ही आपले शिक्षण पूर्ण करून ही पात्रता मिळवली आहे. तेव्हा आता तुम्ही राष्ट्रीय चळवळीत भाग घेऊन अधिक काही साधेलच असे नाही.

टिळकांचा सल्ला त्यांच्या राजकीय दृष्टिकोनाशी मिळताजुळता होता. कारण स्वराज्यासाठी ब्रिटिश सरकारशी प्रतियोगी सहकार करावा असेच ते म्हणत होते.

–'माझा जीवनप्रवाह' या आत्मचरित्रातून

# दत्तात्रय बाळकृष्ण कालेलकर

टिळकांशी त्यांचा मित्र बोलता बोलता म्हणाला, ''बळवंतराव, स्वराज्यांत तुम्ही कोणते काम पत्कराल? तुम्ही मुख्य दिवाण व्हाल, की परराष्ट्रमंत्री बनाल?'' टिळकांनी उत्तर दिलें, ''नाही हो, स्वराज्य स्थापन झाल्यावर एखाद्या स्वदेशी कॉलेजांत गणित विषयाच्या प्रोफेसराचे काम पत्करीन व सार्वजनिक चळवळींतून अंग काढून घेईन. मला राजकारणाचा तिटकारा आहे. 'डिफरेन्शिअल कॅल्क्युलस'वर एखादे पुस्तक लिहावें असें मला अजून वाटतें. देशाची स्थिति फार वाईट आहे आणि तुमच्यापैकी कोणी काही करीत नाही, म्हणून मला इकडे लक्ष घालावें लागत आहे.''

# वासुदेव रामराव कुलकर्णी

(मंडाले तुरुंगात लो. टिळकांसाठी स्वयंपाक करण्याकरिता
येरवडा तुरुंगांतून पाठवण्यात आलेला कैदी)

महाराजांची प्रकृति मूळची खंबीर यांत शंका नाही. मी तेथें सुमारें तीन वर्षे होतों. पण महाराजांचें उतारवय झालें असूनहि तेवढ्या काळांत त्यांची फक्त एक-दोनदाच प्रकृति बिघडली होती. एकदां कॉलऱ्यासारखा त्यांस कांही विकार झाला. दोनतीन रेच फार मोठे झाले व थोडी वांतीहि झाली. त्यामुळें ते अगदी गळूनहि गेले. पण याहि वेळी त्यांनी आपल्या शरीरास मला स्पर्श करूं दिला नाही. डॉक्टर आणून जेलरने त्यांस औषधें दिली. या वेळी त्यांची तेथील अधिकाऱ्यांनी फारच काळजी घेतली यांत शंका नाही. वरील मुदतीत मी मात्र बऱ्याच वेळा आजारी पडलो. पण प्रत्यक्ष माझ्या बापाप्रमाणे महाराजांनी मला सांभाळले व अधिकारी लोक म्हणत असतांहि जेलच्या दवाखान्यांत मला न पाठविता तेथेच ठेवून त्यांनी माझी शुश्रूषा केली! फार काय, पण स्वयंपाक त्यांनी स्वत: करावा व आपले अन्न मला जेवूं घालून मग त्यांनी खावे. पण जेलर म्हणत असता तुरुंगांतले अन्नहि मला त्यांनी खाऊ दिले नाही. फार काय सांगू, ते माझे यजमान, पण तीन वर्षे त्यांनी मला आपल्या मुलासारखे वागविले. वास्तविक मी सक्तमजुरीचा कैदी म्हणून मला सर्व बंदी असे. पण महाराजांनी मला नेहमी आपल्याबरोबर चहा द्यावा, आपण अर्धपोटी राहून मला आपले अन्न खाण्यास द्यावें, बरोबरीच्या माणसाप्रमाणें माझ्याशी गप्पागोष्टी कराव्यात, आपल्याच स्पेशल न्हाव्याकडून माझी श्मश्रू करविली जाईल असा प्रयत्न करावा व काळजी घ्यावी, आजारपणांत घरच्या माणसापेक्षांहि जास्त जपावे, मी लवकर सुटावे म्हणून कायदेशीर प्रयत्न करावा वगैरे वगैरे शेकडो गोष्टी आठवून ऊर भरून येऊन आता डोक्यांत काहूर उठल्यामुळे काहीच सुचेनासे झाले आहे.

## वीर वामन गोपाळ जोशी

(संपादक 'स्वतंत्र हिंदुस्थान', असहयोग-पक्षाचे पुढारी, उमरावती)

अकोला मुक्कामीं असतां तेथील सुप्रसिद्ध डॉ. दादासाहेब कोल्हटकर यांनी लोकमान्यांस पुढील सवाल केला–'धर्माच्या पांघरुणाखाली राजकारण केल्यास तें सोयीचें होणार नाही काय?' लोकमान्यांनी उत्तर दिलें–''नाही. राजकारणास धर्माचें पांघरूण चढविले की, धर्मभोळे लोक भोंवती जमा होतात आणि शेवटी राजकारण बाजूस राहून धर्माच्याच भानगडींना महत्त्व प्राप्त होते. मात्र धर्मतत्त्वांचे अधिष्ठान राजकारणास पाहिजे, परंतु त्यास धर्माचा पेहेराव नको; त्यास त्याचा स्वत:चाच पेहेराव पाहिजे. राजकारण गुप्तपणें करणें कोणास इष्ट वाटत असल्यास त्यानें तसें ते खुशाल करावे. परंतु गुप्तपणें करावयाचे असले तरी राजकारण हे राजकारण म्हणून करावे, म्हणजे त्याच्याभोवती जमा होणाऱ्या अनुयायांत राजकारणाची कल्पना स्पष्टपणे वावरत राहील व त्याने उत्पन्न केलेली चळवळ कशाहि संकटांत सापडली तरी तिच्यातील राजकारण नाहीसे होणार नाही.''

## व्हॅलेंटाईन चिरोल

(लंडन टाइम्सच्या परराष्ट्र विभागाचे प्रमुख)

मी वर्तमानपत्रांत लिहिण्याचा धंदा आज किती तरी वर्षें करीत आहें. या अवधींत मला अडवून खडसावून जाब विचारणारे दोनच धीट गृहस्थ आढळले. पैकीं एक टिळक आणि दुसरे जर्मन बादशहा कैसर विल्यम. हीं दोन नांवें मी एका वाक्यांत उच्चारतों याचें कित्येकांना मोठें आश्चर्य वाटेल. पण खरोखरच तीं दोन नांवें एकत्र उच्चारण्याला योग्य आहेत.

# केशव सीताराम ठाकरे

(संपादक, प्रबोधन व लोकहितवादी,
पुढे प्रबोधनकार ठाकरे या नावाने प्रसिद्ध)

टिळक यांची व माझी पहिली आणि शेवटची जी एकच भेट झाली त्या वेळी रा. काका जोशी यांच्या समक्ष झालेले संभाषण मी आठवण म्हणून उद्‌धृत करीत आहे.

सन १९१८चा मार्च महिना. तारीख स्मरत नाही. चित्रशाळेत माझा वक्तृत्वशास्त्र हा ग्रंथ छापण्याचे काम चालू होते. २६० पानावरील बूकर टी. वॉशिंग्टनबद्दलचा मजकूर घेऊन मी दादरहून आलो व तडक चित्रशाळेत गेलो. नेहमीप्रमाणे काका जोशी टेबलाजवळ उभे राहून काही पत्रे वाचीत होते व जवळच्या बाकावर एक वृद्ध गृहस्थ काही छापील प्रुफासारखे कागद वाचीत होते. बाजूला उपरण्यावर पगडी ठेवलेली होती व वाचनात मग्न होते. माझ्या कामाबद्दल योग्य तो खुलासा व निरवानिरव दोनतीन मिनिटांत होताच, काका जोशी त्या गृहस्थाकडे वळून म्हणाले, ‘‘वक्तृत्वशास्त्राचे कर्ते तुम्हाला पाहावयाचे होते ना, हे पाहा आमचे ठाकरे!’’ मी नमस्कार केला.

**टिळक**–वक्तृत्वशास्त्र तुम्हीच लिहिले काय? फार छान प्रयत्न आहे.

**मी**–आपण कधी वाचले? पुस्तक अजून बाहेर पडलेले नाही.

**टिळक**–पुस्तक बाहेर पडले नसले तरी त्याची प्रुफे बाहेर जा-ये करतातच. मी बहुतेक सर्व प्रकरणे वाचली आहेत. काकांनीच मला प्रुफे दाखविली. मला हे पुस्तक फार आवडले. प्रसिद्ध झाल्यावर मीच त्यावर अभिप्राय देणार आहे.

**मी**–आपला मी फार आभारी आहे.

**टिळक**–आपण कोण देशस्थ का?

**मी**–नव्हे. मी कायस्थ आहे.

**टिळक**–तरीच ही लेखणी इतका टणत्कार करते. कायस्थांची

लेखणी अलीकडे फार झोपाळू झाली आहे. ती जागी होईल तर देशकार्याचा वेग बराच वाढेल. पण ती जागीच होत नाही.

**मी**–वाङ्मयक्षेत्र काबीज करणाऱ्या ब्राह्मणांकडून तिला योग्य ते उत्तेजन मिळत नाही, असे मला वाटते.

**टिळक**–अहो, ब्राह्मण म्हणजे भिक्षुक. भिक्षुकांच्या आश्रयाची क्षत्रियांनी अपेक्षा करावी, यालाच मी झोप म्हणतो. हा मोह आहे. कायस्थ म्हणजे स्वावलंबन व आत्मतेज यांचा आदर्श पाहिजे. त्याने कोणाच्या उत्तेजनाची किंवा अभिप्रायाची पर्वा न करता आत्मबळानेच पुढे सरसावले पाहिजे. शिवाजीच्या वेळी तुमचे शेकडो कायस्थ लोक देशकार्यासाठी मी मी म्हणत पुढे सरसावले, ते काय भिक्षुक ब्राह्मणांच्या उत्तेजनाने?

नंतर काही इकडेतिकडे भाषण होऊन मी टिळकांची रजा घेतली. 'पुस्तकाची एक प्रत तयार करून माझ्याबरोबर द्या. आम्ही विलायतेला जात आहोत. बोटीत निवांतपणाने वाचू.' असे मला सांगितल्यावरून दोन 'ॲडव्हान्स कॉप्या' कापडी बाइंडिंगच्या तयार करून, त्या त्यांजकडे पाठवून दिल्या. त्यावर टिळकांनी 'कीर्तन' मासिकात पत्रद्वारा दिलेला अभिप्राय सर्वश्रुतच आहे.

# कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर ऊर्फ मास्तर कृष्णा

(गवई, गंधर्व नाटकमंडळींतील एक प्रमुख नट, पुणे)

सन १९१४च्या गणपत्युत्सवात, गायकवाडवाड्यात श्रीगजाननासमोर, बुधवार ता. २ सप्टेंबर रोजी गुरुवर्य भास्करबोवा बखले, श्रीयुत नारायणराव राजहंस व मी अशा तिघांचे गायन झाले होते. गाण्याचा हा कार्यक्रम झाल्यानंतर लोकमान्यांनी आम्हांस दुग्धपानाकरिता आपल्या घरात नेले; व बोवांच्या गाण्याची प्रशंसा करून ते म्हणाले की, ''भास्करबोवा, मला जरी गाण्याची विशेष आवड व षोक नाही तरी एकेकाळी आपल्या या भरतवर्षांत उत्कर्षाच्या शिखरास पोहोचलेल्या या पंचम वेदाबद्दल मला फार आदर आहे; आणि या गहन व ईश्वरदत्त कलेमध्ये आपण परिश्रमपूर्वक यश मिळविल्याबद्दल मला फार आनंद होतो व अभिमान वाटतो. मला या गायनशास्त्राकडे लक्ष देण्यास मुळी कधी फुरसदच झाली नाही; व मुळापासून माझे लक्षहि पण तिकडे गेले नाही. तथापि, आपले गाणे ऐकल्यानंतर या विद्येची अपूर्वता आज मला काहीशी कळली.'' असे म्हणून मोठ्या प्रेमाने लोकमान्यांनी एक जरीचे उपरणे भास्करबोवांच्या अंगावर घातले! गुरुवर्यांनी त्या विभूतीचा तो प्रसादच समजून शेवटपर्यंत ते उपरणे तसेच आपणांजवळ मोठ्या काळजीने जपून ठेविले होते व ''या प्रसादामुळेच तेव्हांपासून आपला उत्तरोत्तर उत्कर्षच होत चालला आहे व उत्तर हिंदुस्थानांत विशेषत: पंजाबामध्ये आपली कीर्ति वाढण्यास याच महात्म्याचा आशीर्वाद कारणीभूत झाला'' असेहि ते नेहमी म्हणत असत. 'गुणी गुणं वेत्ति' हे वचन कसे खरे आहे व गुणीजनांचा परामर्श लोकमान्य कसे घेत हे यावरून स्पष्ट होते.

## यशवंत गणेश कुलकर्णी

(ताईमहाराज व श्रीजगन्नाथमहाराज यांचे माजी कारभारी)

लोकमान्यांना सुपारीचे व्यसन होते हे प्रसिद्धच आहे; ते श्री. बाबामहाराजांच्या वाड्यात ज्या ज्या वेळी येत, त्या त्या वेळी त्यांच्यापुढे सुपारी केली असतां त्यांनी ती चुकूनसुद्धा घेतली नाही. प्रत्येक वेळी जेव्हा त्यांच्यापुढे सुपारी येऊ लागे तेव्हा ते म्हणत, ''मी ट्रस्टी आहे; व ट्रस्टीनें ट्रस्ट प्रॉपर्टीच्या सुपारीच्या खांडाससुद्धां शिवतां कामा नये ही सामान्य गोष्ट तुमच्या ध्यानांत न येता मजपुढे सुपारी करतां, तेव्हां तुम्हांस काय म्हणावे?'' या निःस्पृह वागण्याचे फळ पुढे ताईमहाराज प्रकरणात दिसून आले. फौजदारी खटला चालला असता, मि. क्लेमंट, स्पेशल मॅजिस्ट्रेट यांनी श्री. ताईमहाराजांस असा सवाल केला की, 'टिळकांनी स्वतःच्या फायद्याकरितां सर्व काम केले ना?' त्यावर बाईंनी उत्तर दिले की, 'टिळकांनी जें जें केलें ते सर्व इस्टेटीच्या फायद्याकरता केले, स्वतःकरितां कांहीहि केले नाही!' या उत्तराने साहेब बहादुरांचे समाधान झाले नाही; व त्यांनी बाईंना 'तुम्हाला माझा प्रश्नच समजला नाही, प्रश्न नीट समजून घ्या व मग उत्तर द्या' असे सांगून व तोच प्रश्न त्यास तीन वेळ समजून सांगून प्रश्न समजला अशी कबुली घेतली तरीहि उत्तर विचारता प्रथमचेच उत्तर कायम, हे पाहून निरुपायानें त्यांनी ते उत्तर लिहून घेतले!

## दामोदर विश्वनाथ गोखले

(बी.ए., एलएल.बी., संपादक : मराठा, पुणे)

लोकमान्यांवरील जामीनकीच्या खटल्याची तयारी चालू झाली. लोकमान्यांनी बॅरिस्टर जीना यांना आपले वकीलपत्र दिले होते. बचाव कसा करावयाचा याची कायद्याच्या दृष्टीने चर्चा चालली असतांना लोकमान्यांनी बॅरिस्टर जीनांस सांगितले की, ''माझा बचाव करीत असताना कायद्याच्या ओढाताणीकडे दुर्लक्ष करा असे मी सांगत नाही, पण ही गोष्ट लक्षांत ठेवा की, हा खटला टिळकांवर आहे व त्यांत मॅजिस्ट्रेट हे खरे न्यायाधीश नसून माझे देशबांधव हे खरे न्यायाधीश आहेत. मला त्यांची खात्री पटवावयाची आहे; या मॅजिस्ट्रेटची नाही. खटल्यापासूनहि लोकांना शिक्षण मिळून चारदोन पावले राष्ट्रीय प्रगति झाली तरच त्या खटल्याचे चीज आहे, एरव्ही नाही.'' वरील गोष्टीवरून लोकमान्यांची खरी दृष्टी कोठे होती व त्यांचे धोरण काय होते याची नीट कल्पना येईल.

❖ ❖ ❖

'गीतारहस्य' लिहून झाल्यावर 'वैदिक क्रॉनॉलॉजी' हे पुस्तक टिळकांनी लिहावयास घेतले. 'ओरायन'ची सुधारलेली आवृत्ती म्हणजे हे पुस्तक. त्याची दोनच प्रकरणे लिहून झाली. दुसऱ्या प्रकरणाच्या शेवटी त्यांनी संकल्पित ग्रंथांची यादी दिली आहे. ती एकंदर दहा ग्रंथांची आहे : (१) हिंदुधर्माचा इतिहास (२) भारतीय राष्ट्रीयत्व (३) भारताचा रामायण–भारतपूर्व इतिहास (४) शंकरदर्शन (भारतीय अद्वैतवाद–मोनिझम) (५) प्रांतिक राज्यकारभार (६) हिंदुकायदा (७) इन्फिनिटेझिमल कॅल्क्युलस (८) श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य भारतीय नीतिशास्त्र (९) शिवाजीचे चरित्र (१०) खाल्डिया भारत. यांपैकी गीतारहस्य लिहून झाले.

–'लोकमान्य' या श्री. न. र. फाटक यांच्या चरित्रग्रंथांतून

## Rabindranath Tagore

The incident which brought me in personal touch with Lokamanya Tilak, I have mentioned elsewhere. It was when he surprised me with a request through a messenger that I should proceed to Europe with the help of Rs. 50,000 which he was ready to offer me. My surprise was still greater, when I was assured that Tilak did not want my help for any propaganda which was his own, that he would be sorry if I followed the path which he himself was pursuing at that moment for the benefit of his country. He wanted me to be true to myself and, through my effort to serve humanity, in my own way to serve India. I felt that this proposal from Tilak carried with it the highest honour that I had ever received from my countrymen. I do not know if I was worthy of it, but it revealed to me the greatness of Tilak's personality which deeply impressed my mind. He had more faith in Truth than in method. His ideal of the fulfillment of India's Destiny was vast, and therefore it had ample room even for a dreamer of dreams, even for ‘‘music-maker’’. He knew that freedom had its diverse aspects, and therefore it could be truly reached, if individuals had their full scope to use their special gifts for opening out paths that were diverse in their directions.

# विष्णु दिगंबर पलुस्कर

(गायनाचार्य, प्रिन्सिपाल गांधर्व महाविद्यालय, मुंबई)

विद्वद्वर्य लोकमान्यांचा व माझा परिचय प्रथमत: काँग्रेसचे वळीं बनारस येथें झाला व तो शेवटपर्यंत टिकला, हा माझ्या भाग्याचा योग असें मी समजतों. त्यांनीं माझ्या गांधर्व महाविद्यालय संस्थेविषयीं मोठ्या कळकळीनें एक गोष्ट सांगितली, ती अशी–''संस्था ही लोकांपुढें आपण आणल्याशिवाय लोक तिकडे लक्ष देणार नाहींत, मग ती संस्था लोकोपयोगी असो वा नसो. करितां संस्थेचे उद्देश, संस्थेचे दैनिक, मासिक, वार्षिक कार्यक्रम सर्व वर्तमानपत्रांतून लोकांचे नजरेसमोर आणण्याचें विसरूं नका.'' हें एवढेंच लोकमान्याचें वाक्य मला वारंवार आठवतें. मला असा भ्रम होता कीं, ज्या संस्थेचे हेतू लोकहितकारक असतील त्या संस्थेकडे सहजच लोकांचें लक्ष जाईल; पण सक्रिय लक्ष तर राहिलेंच, परंतु निष्क्रिय लक्ष सुद्धां सर्वसाधारण जनता देण्यास तयार नसते, हें लोकमान्यांच्या अनुभवाचें व दूरदर्शीपणाचें वाक्य मी यावज्जन्म विसरणार नाहीं. लोकमान्यांनीं पुढें 'केसरी' व 'मराठा' ही दोन्हीं पत्रें लाहोरचे गांधर्व महाविद्यालयास मोफत सुरू केलीं. शिवाय शंभर रुपये विद्यालयास देऊन ते विद्यालयाचे लाईफमेंबरहि झाले!

# मि. जे. चौधरी

(१८९७ मधील लोकमान्यांचा खटला चालविण्यास इतर बॅरिस्टरांबरोबर कलकत्तेकरांनीं मुंबईस पाठविलेले बॅरिस्टर)

एकंदर खटल्याची हकीकत फारच लांबलचक आणि कंटाळवाणी होण्याचा संभव आहे, तरी ती हकीकत समग्र न देतां फक्त ज्या एकदोन गोष्टींवरून टिळकांची अचाट बुद्धिमत्ता दिसून आली, त्यांचाच उल्लेख मी येथें करतो. न्यायमूर्ति स्ट्रॅची यांनी लो. टिळकांस दोषी ठरवून शिक्षा सुनावली, तेव्हा बराच उशीर झाल्यामुळे न्यायमूर्तींच्या निकालाची नक्कल घेऊन आम्ही सर्वांनी दुसरे दिवशी सकाळी भायखळा क्लबमध्ये जाऊन तेथे प्रिव्ही कौन्सिलपुढे करण्याच्या अपिलाचे मुद्दे काढावेत असे ठरले. त्याप्रमाणे आम्ही तेथे जातो तोच जेलचा शिपाई काही कागद घेऊन आमची वाट पाहत आहे, असे आढळले आणि ते कागद कसले आहेत हे पाहताच तर आम्ही अगदी आश्चर्यमूढ होऊन गेलो. ते कागद म्हणजे आम्ही काढणारे अपिलाचे मुद्देच होते! टिळकांनी निकाल फक्त ऐकला होता, पण तो त्यांच्या स्मरणांत इतका पक्का होता की, त्यांनी जेलमध्ये जाताच अपिलाचे सर्व मुद्दे पेन्सिलीने लिहून काढले. ते पाहून बॅरिस्टर प्यू आणि सर गार्थ यांनी स्पष्टपणे कबूल केले की, टिळकांनी काढलेल्या मुद्यांपेक्षा त्यांनाहि जास्त चांगल्या तऱ्हेने काढता आले नसते.

## रामचंद्र बळवंत टिळक

(लोकमान्यांचे ज्येष्ठ चिरंजीव, पुणे)

सिंहगडावरच त्यांनी एकदां आम्हांस असें सांगितलें कीं, ‘‘तुम्ही पाहिजे तो धंदा करा. तुम्ही जोडे तयार केले तरी मला वाईट वाटणार नाही की, माझी ब्राह्मणांची मुलें चांभार निघाली म्हणून. परंतु त्याचबरोबर हेंहि लक्षांत ठेवा की, जें कांही कराल तें इतकें उत्कृष्ट झालें पाहिजे कीं, त्या धंद्यासंबंधी कोणी विचार करूं लागला तर तुमचें नांव त्याचे मनांमध्यें पहिल्यांदा उभें राहिले पाहिजे. उदाहरणार्थ, जसें चहाची आठवण झाली की, ‘लिप्टन’ हे नाव डोळ्यापुढें उभें राहातें, बिस्किटांची आठवण झाली कीं, ‘हंटले-पामर’ हे नाव डोळ्यापुढें उभें राहातें, शारीरिक शक्तीची गोष्ट निघाली की पूर्वीचा ‘भीमसेन’ सोडून दिला तरी आधुनिक सॅन्डो अथवा ‘राममूर्ती’ हे डोळ्यापुढे उभे राहतात, तसें तुम्ही ज्या व्यवसायात पडाल त्याची गोष्ट निघाली असता तुमचे नांव लोकांच्या मन:चक्षूंसमोर प्रथम उभे राहिलें पाहिजे व अशा तऱ्हेची मनोवृत्ति ज्या देशामध्यें प्रत्येक धंद्यांत पडणाऱ्या मनुष्यामध्यें आहे त्या देशाची केव्हांहि भरभराट झाल्यावाचून राहणार नाही, हे निश्चित समजा.

## परशुराम व्यंकटराव घारपुरे

(बॅरिस्टर, अध्यक्ष, डिस्ट्रिक्ट बोर्ड, वर्धा)

१९१८ला होमरूल फंड जमविण्यासाठीं, वऱ्हाड मध्यप्रांतांत लोकमान्यांनीं दौरा काढला. तेव्हा त्यांच्या संन्निध रहाण्याचें भाग्य मला लाधलें व त्यावेळीं त्यांचे बऱ्याच विषयावरील विचार श्रवण करावयास मिळाले, राजकारणासंबंधी एकदा ते म्हणाले,

''एकजूट झाल्याशिवाय कोणतेंहि राजकारण घडून येणें शक्य नाही. राजकारण म्हणजे कांहीं सोपी गोष्ट नव्हे. धोरण बांधून प्रतिपक्षाला चीत करायचें असतें व हें करीत असताना राग, द्वेष याचा मागमूसहि दिसू न देतां हसतमुख राहावें लागतें, तें निराळेंच. राजकारणाचा डाव मोठा चमत्कारिक आहे, तो इतर खेळासारखा संपणारा नसून अहर्निश, पुढे जास्त जास्त वाढत जाणारा आहे, व खुबी आहे कीं, या खेळांतील प्रत्येक भागाची समाप्ति (वरपांगी) तडजोडीनें होत असते; परंतु सदरहु तडजोड विरुद्ध पक्षावर लादावी लागते. Politics is like a non-ending game, in which every stage is reached, apparently, by compromise, but this compromise has to be thrusted on the oppossite side.''

## गंगाधर बाळकृष्ण देशपांडे

(कर्नाटकचे पुढारी, बेळगांव)

वॉर-कॉन्फरन्सच्या वेळीं लोकमान्यांची व महात्माजींची सरदारगृहांत गांठ पडली होती. 'रिक्रूट मिळविण्याकरितां सरकाराला मदत करावी असा एक ठराव कॉन्फरन्सपुढें येणार होता. म. गांधी त्या ठरावावर अनुकूल बोलणार होते. 'पण सरकाराकडून स्वराज्याला पाठिंबा मिळत असल्यास आपण सरकारास मदत करण्यास तयार व्हावें,' असा विचार कॉन्फरन्सपुढें मांडण्याचें लोकमान्यांचें ठरलें होतें. त्याला गांधींनीं पुष्टि द्यावी अशी लोकमान्यांची इच्छा होती, व त्याप्रमाणें ते महात्माजींचें मन वळविण्याचा प्रयत्न करीत होते. त्या वेळीं म. गांधींच्या पाठीवरून हात फिरवून ते म्हणाले "My good friend, you have not burnt your fingers as yet while playing with this Government. During the last forty years my fingers have burnt more than once. When you will get your fingers burnt I am sure you will go ahead of me." म. गांधी हंसले व आपण ठरावाविरुद्ध बोलण्यापेक्षां न बोलण्याचेंच त्यांनी ठरविलें.

## श्रीधर बळवंत टिळक

(लोकमान्यांचे कनिष्ठ चिरंजीव)

सोमवार ता. ८ जून १९१४ रोजी लोकमान्यांनी मंडालेचा तुरुंग सोडला. त्यानंतर कित्येक आठवडे वाट पाहूनहि सरकारनें मंडालेच्या तुरुंगांत त्यांचेपासून काढून घेतलेल्या गीतारहस्याच्या हस्तलिखित वह्या लवकर परत मिळण्याचे चिन्ह दिसेना. जसजसे दिवस लोटूं लागले, तसतसे सरकारच्या हेतूविषयी लोक अधिकाधिक साशंक होऊ लागले. शेवटी काहीजणांनी स्पष्ट बोलून दाखविले की, ''सरकारचें लक्षण कांहीं ठीक दिसत नाही. वह्या परत न करण्याचा विचार जवळ जवळ ठरल्यासारखा दिसतो.'' हे तर्क-कुतर्क लोकमान्यांच्या कानांवर पडताच ते म्हणाले, ''भिण्याचें कांहीएक कारण नाही. वह्या सरकारच्या कबजात असल्या तरी ग्रंथ माझे डोक्यांत आहे. फुरसदीचे वेळी महिना दोन महिने सिंहगडावर बसून मी तो पुनः समग्र लिहून काढीन.''

## म. गो. अभ्यंकर, पुणें

सन १८९७ सालीं टिळक दाजीसाहेब खरे यांचे बंगल्यावर उतरले असतां रात्रीं ९-३० वाजता एक युरोपियन पो. सुपरिंटेंडंट आला व बाहेर बोलावून घेऊन त्याने १२४ कलमाखालचें वारंट त्यांना दाखविलें. त्यास पांच मिनिटें थांबण्यास सांगून टिळक आंत गेले व दाजीसाहेबांबरोबर त्यांनी त्या कलमासंबंधीं चर्चा केली. दाजीसाहेबांनी प्रे. मॅजिस्ट्रेटचे बंगल्यावर जाऊन जामिनाचा अर्ज करावा व त्याचा निकाल काय होतो तो तुरुंगांत कळवावा असें ठरवून टिळक दहाचे सुमारास पोलिसाबरोबर तुरुंगांत गेले. १०-३० वाजता तुरुंगांत गेल्याबरोबर टिळक अंथरुणावर निजले. लगेच त्यांना गाढ झोंप लागली. ११-३० वाजता दाजीसाहेब आले, त्यावेळीं टिळक घोरत होते! त्यांनी दोन हांका मारल्यावर ते जागे झाले.

## सदाशिव विनायक बापट

(संपादक, लो. टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका)

एका अनंत चतुर्दशीचे दिवशी श्रीगणपती विसर्जन करून, लकडी पुलावरून रात्री लोकमान्य घरी परत आल्यावर स्नान, भोजन वगैरे होऊन स्वारी आरामखुर्चीवर स्वस्थ पडली होती. पण त्यावेळी ते मनाने व देहाने बरेच अस्वस्थ असल्याचे स्पष्ट दिसत होते. इतक्यांत प्रो. कौशाम्बी त्यांजकडे आले व त्यांचेशी काही तात्त्विक चर्चा करू लागले. पण नेहमीप्रमाणे लोकमान्य आपल्या आनंदी वृत्तींत यावेळी नाहीत असे त्यांसहि वाटल्याखेरीज राहिले नाही. म्हणून अखेर ते त्यांस म्हणालेच, ''आज आपली प्रकृति बरी नाहीशी दिसते.'' चटकन लोकमान्य म्हणतात, ''छे, तसें काही नाही. माझी प्रकृति ठीक आहे. पण गणपती विसर्जन करून मी घरी आल्यावर मला नेहमीच असें चुकल्याचुकल्यासारखे होते. चैन पडत नाही. यामुळे मनास थोडी अस्वस्थता आली आहे इतकेच.'' हे ऐकून कौशाम्बी आश्चर्यचकित होऊन म्हणाले, ''एकूण आपल्यासारख्या ज्ञानी पुरुषावरहि अशा लौकिक गोष्टींचा परिणाम होतोच म्हणावयाचा!'' लोकमान्य म्हणाले, ''अहो, संस्कारांचा परिणाम हा काही नाही म्हटले तरी कोणावरही थोडा तरी व्हावयाचाच. शिवाय, भक्तीच्या पोटांतून निघालेले ज्ञान हेंहि अखेर भक्तीतच विलीन झाल्यास तीहि एक आनंदाची अवस्था आहे, हे सूक्ष्म विचारांती तुमचेहि लक्षांत येईल.''

## केशव बळवंत जोशी

(मुख्याध्यापक, मुंबई)

१९१५तली गोष्ट. मुंबईंत डॉ. नानासाहेब देशमुखांच्या घरी लोकमान्य, डॉ. देशमुख, श्री. अण्णासाहेब नेने, वे. गोडसेशास्त्री, श्री. चौंडेबुवा इत्यादि शेलकी मंडळी जमली असता मीहि लोकमान्यांच्या दर्शनास गेलो होतो. कित्येक राजकारणांच्या गोष्टी निघून शेवटी वे. शा. सं. नरहरशास्त्री गोडसे यांनी 'गीतारहस्य हा ग्रंथ ओवीबद्ध करवून ठेवावा, म्हणजे इतर प्रासादिक ग्रंथांप्रमाणेच तो नित्य पाठांत राहून व्यासपीठावरूनहि प्रवचनकार व पुराणिक इत्यादिकांकडून नित्य निरूपणांत येऊं शकेल. हे काम मजवर सोपवावे. मी ते अवश्य व लौकर करीन,' अशी विनंति केली. लोकमान्यांनी त्या वेळी ते म्हणणे शांतपणे ऐकून घेतले, व याबद्दल पुन्हा एखादे वेळी विचार करण्याचें आश्वासन दिले. त्याचे पुढे काय झालें हें कळलें नाही.

(वे. नरहरशास्त्री जोशी केशवजी नाईक चाळींचे रहिवासी होते.)

## नारायण बाळकृष्ण केळकर

(लेखक, मॅनेजर, प्राणिरक्षक संस्था, धुळे)

हल्लीच्या तरुणांनी काय करावे असा प्रश्न निघाला असतां लोकमान्य म्हणाले, ''जो उठला तो लागला सरकारी नोकरीच्या मागें! स्वावलंबनाने स्वत:च्या पायावर उभे राहण्यास शिकलें पाहिजे. मला नोकरी मिळत नाही अशी कधी मारवाड्याच्या मुलाने तक्रार केली आहे का? त्यांचें लक्ष आपल्या उद्योगधंद्याकडे असते. य:कश्चित् माळीण, की जिला पुरे दहा आंकडेहि मोजता येत नाहीत ती देखील रुपयाच्या मालाचे सतराअठरा आणे कमावते आणि तुमच्या हातांत रुपया दिला तर त्याचे तुम्ही बारा आणे तरी परत आणाल की नाही याची भ्रांतच! विद्यार्थ्यांनी आता नोकरीच्या नादांत फारसे पडू नये. नोकरी म्हणजे गुलामगिरी होय!

# लो. टिळकांचा विलक्षण सन्मान

पुण्याहून ना. टिळक येतील हें जाणून येथील लोकांनीं त्यांचा विशेष रीतीनें सन्मान करण्याचा आधींपासूनच बेत केला असावा. हें गणेश चतुर्थीच्या दिवशीं येथें जो कांही प्रकार घडून आला त्यावरून कोणालाही समजेल. गणेशचतुर्थीचा दिवस उगवला तोच, जिकडेतिकडे ना. बळवंतरावजी टिळक एकदोन ठिकाणी अध्यक्ष होणार, काही ठिकाणी त्यास पानसुपारी होणार, वगैरे बातम्या शहरात पसरल्या होत्या. सोमवारी दोन प्रहरांनंतर साडेतीन वाजता ना. टिळकांची स्वारी कांदेवाडीतील केशवजी नाईकांच्या चाळीत गेली. रस्त्यापासून चाळीत नामदारांस पांढऱ्या स्वच्छ कपड्यावरून चालत नेले. डॉ. नानासाहेब देशमुख वगैरे मंडळी आधीच येऊन बसली होती. वे. नरहरशास्त्री गोडसे यांचे 'गृहस्थाश्रम' ह्याविषयावर ना. टिळकांच्या अध्यक्षतेखाली व्याख्यान झाले. जितक्या शक्य तितक्या रीतीनें केशवजी नाईकाच्या चाळीतील लोकांनीं नामदारांचे स्वागत केले व त्यांच्याबद्दलची आपली पूज्यबुद्धि व कृतज्ञताबुद्धि स्पष्ट रीतीनें त्यांने व्यक्त केली. ह्याच चाळींत पाटणकर संगीत मंडळीचे मालक रा. रा. माधवराव पाटणकर यांनी ना. बळवंतरावजींचें योग्य स्मारक आतां करण्याबद्दल सुचवून आपण त्या कार्यासाठी पांचशें रुपयांची रक्कम देण्याचें अभिवचन दिले. केशवजी नाईकांच्या चाळीतून ना. टिळकांची स्वारी फणसवाडीत जगन्नाथाच्या चाळीत गेली.

–दै. काळ १९ सप्टेंबर १९०१

२००१ साली वरील प्रसंगाला १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने
केशवजी नाईक चाळीतील गणेशोत्सवाने 'टिळकांचे पुनरागमन' या नावाने
हा प्रसंग अभिनव पद्धतीने पुनरुज्जीवित केला.

# विनायक विष्णु रानडे

(बी.ए.एल्.एल्.बी., प्रसिद्ध कॉन्ट्रॅक्टर, पुणें)

काँग्रेसची बैठक नेहमीप्रमाणें संपल्यावर बळवंतरावजीस स्वामी विवेकानंद यांचे मठास त्यांचे निमंत्रणावरून भेट द्यावी लागली. बळवंतरावजी व त्यांचे बरोबर आम्ही १०/१२ मंडळी अशी गंगेचे पात्रांतून नौकेनें सुमारें १–१।। मैल गेल्यावर गंगापार होऊन गंगेचे कांठींच असलेल्या त्या शांत आश्रमास जाण्याकरितां कांठावर नौकेंतून उतरलों. त्यावेळीं बळवंतरावजीचें स्वागत करण्याकरितां खुद्द स्वामीजींनीं नौकेंतून उतरून घेण्याकरितां त्यांना हात दिला व काठावर ते पोहोचल्यावर त्यांनीं कडकडून प्रेमालिंगन देऊन प्रेमाश्रूंनीं एकमेकांस स्नान घातलें! त्यावेळचा तो देखावा म्हणजे महाराष्ट्राची व बंगालची अंत:करणमय सप्रेम भेट मूर्तिमंत उभी आहे असें भासलें. नंतर स्वामींनीं आम्हा सर्वजणांचें स्वागत करून मठांत नेले. तेथें दुग्धप्राशन, फलाशन वगैरे उरकल्यावर परस्परांच्या कांहीं हितगुजाच्या व कांहीं प्रेमाच्या गोष्टी झाल्या. त्यांतील मुख्य मुद्याची गोष्ट म्हणजे आपण परकीयांच्या अंमलाखालीं असतां आपल्या राजकारणाचें धोरण जितकें स्वावलंबनपर राखतां येईल, व जेणेंकरून अडवणुकीचे मार्गाचा अवलंब करून आपणांस राजकर्त्यांना नाइलाजास्तव हार खाणें भाग पाडतां येईल असेंच असावयास पाहिजे वगैरे. ह्या वेळीं स्वामीजी युरोप, अमेरिका वगैरे पाश्चात्य देशांत जाऊन सनातन धर्मविषयक व वेदान्तविषयक व्याख्यानें देऊन दिगंत कीर्ति मिळवून परत आलेले होते व त्यांना देशदेशच्या मानवी स्वभावाची व महत्त्वाकांक्षेची चांगली ओळख पटलेली असल्यानें त्यांचा वरील विचार ठाम झालेला दिसत होता व कार्याचा पुरस्कर्तेपणा बळवंतरावजींशिवाय दुसरे कोणास साधणार नाहीं हें जाणूनच स्वामींनीं हा भेटीचा योग आणिलेला होता.

# गोपाळ गणेश आगरकर

कोल्हापूर प्रकरणात टिळक व आगरकर यांना चार महिने एकत्र तुरुंगवास झाला होता त्यावेळची ही एक आठवण.

सगळ्या तीन महिन्यांत आम्हीं चांदोबास दोनदां मोठ्या खटपटीने गजांतून पाहिलें. आठदहा दिवस सुरवंटांमुळें फार बेजार झालों. कित्येकदां तर आम्हीं रात्रींच्या रात्रीं बोलत घालविल्याचें मला आठवतें. आम्ही अभ्यास करण्यासाठी कॉलेजात राहिलों असतां सरकारी नोकरी न पत्करतां देशसेवेंत आयुष्य घालविण्याचा ज्या दिवशीं निश्चय केला, त्या दिवसापासून आम्हीं जे जे बोललों होतों त्याची अनेक वेळां पुनरावृत्ति होत असें. अमुक गृहस्थाला कँपमध्यें भेटायला गेला असतां परत येतांना काळोखांत वाट चुकून बारावर दोन वाजण्याच्या सुमारास फिरतां फिरतां बंडावर कसें येऊन ठेपलों; शाळेच्या संबंधानें विष्णुशास्त्र्यांशीं बोलणें लावण्यास गांवांत गेलों असतां कॉलेजला परत येतांना थंडीनें किती कुडकुडलों, वचन दिलें असतां शाळा आणि छापखाना काढला त्या वेळेस कोणकोणत्या लोकांनीं मागें घेतलें, आपले मूळचे हेतू कोणते आणि ते कितपत सिद्धीस गेले आहेत, या देशावर इंग्रजांचें राज्य झाल्यानें त्याचें कोणकोणत्या बाबतींत हित आणि अनहित होत आहे, लोकशिक्षण उत्तरोत्तर जारीनें पसरत गेलें तर हिंदुस्थानची भावी स्थिति काय होईल, कोल्हापूर प्रकरणांत आपली चुकी किती आणि आपणास भोगावी लागत असलेली शिक्षा किती न्याय्य आहे वगैरे नाहीं नाहीं त्या विषयांवर आमचा एकेक वेळ एवढ्या जोरानें वाद चाले कीं, आसपासचे शिपाई 'हळू बोला, हळू बोला' असा इशारा करीत व बोलतां बोलतां रात्र निघून जाई.

–'डोंगरीच्या तुरुंगातील १०१ दिवस'मधून

## श्रीपाद अमृत डांगे

(कामगार चळवळीचे अध्वर्यु)

दि. २० फेब्रुवारी १९२० रोजी मुंबईमध्ये एका प्रचंड जाहीर सभेत लाला लजपतराय यांचे स्वागत करण्यात आले. त्या सभेचे अध्यक्षपद बॅ. जीना यांनी घेतले होते व टिळक व ॲनी बेझन्ट यांची त्या सभेत भाषणे झाली. त्याच ठिकाणी दुसऱ्या दिवशी २१ फेब्रुवारी रोजी मुंबईच्या विद्यार्थी संघटनेच्या वतीनेही त्यांचा खास स्वागत समारंभ साजरा करण्यात आला. त्याचेही अध्यक्षस्थान स्वीकारण्याचे टिळकांनी मान्य केले होते. त्या सभेत आर. एस. निमकर यांचे आणि माझे भाषण झाले होते.

या घटनेनंतर थोड्याच दिवसांनी मी आणि पटवर्धन ऊर्फ कमलाकर नावाचा माझा एक मित्र असे दोघेजण खरे यांच्या बंगल्यावर टिळकांच्या निवासस्थानी त्यांना भेटण्यास गेलो. पुढील कामाची दिशा दाखविण्याची आम्ही त्यांना विनंती केली. पहिले काम आम्हांला देण्यात आले ते असे की फिजी आणि इतरत्र आणि चहाच्या मळ्यात पाठविण्यासाठी वेठबिगारी पद्धतीने मजुरांची भरती व निर्यात करणारे जे कंत्राटदार आणि दादा होते त्यांच्या अड्ड्यावर निरोधने-निदर्शने करण्याची तयारी करण्याचे. टिळक आणि गांधी ह्या दोघांनीही हा प्रश्न धसास लावण्याचे ठरविले होते. आम्हाला कामगारांमध्येही, काम करण्यास सांगण्यात आले होते; तसेच ट्रेड युनियन संघटना बांधून अखिल भारतीय परिषद भरविण्याच्या दृष्टीने तयारी करण्यास सांगितले होते.

...अखेर ‘आयटक’ जन्माला आली; वाजतगाजत आली; पण ज्या माणसाने त्यासाठी एवढे कार्य केले त्याला मात्र तिची स्थापना पाहता आली नाही. कारण दि. १ ऑगस्ट १९२० रोजीच टिळकांचे निधन झाले.

## यशवंत गणेश कुलकर्णी

लोकमान्यांच्या गुडघ्यास जबर जखम झालेली होती. गांवांत प्लेगचें मान जास्त वाढूं लागल्यामुळें, आर्यभूषण छापखान्यांतील बरेच कंपॉझीटर गैरहजर असत, त्यामुळें हरिपंत गोखले, आर्यभूषणचे मालक, हे सोमवारीं सकाळचे नऊ वाजतां लोकमान्यांच्या झोपडीवर आले. झोपडी हल्लींच्या सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीच्या जागीं होती व लोकमान्यांस म्हणाले, 'आज बरेच कंपॉझीटर कमी आहेत, तेव्हां कंपोजचें काम आटोपण्यास बराच उशीर होईल व त्यामुळें 'केसरी' छापण्यास बराच वेळ लागेल. सबब उद्यांचा अंक गांवांत वाटण्यापुरतां रात्रीं छापून काढतों व बाहेरगांवीं जाणारा 'केसरी' उद्यां छापून परवां टपाल करीन. त्यावर लोकमान्य रागावून म्हणाले कीं, ''तुमचे छापखान्यांतील कंपॉझीटर नाहींत तर दुसरे छापखान्यांतील बोलवा. आपण दोघेही वारलों तरी आमच्या चौदा दिवसपर्यंत केसरी मंगळवारचा मंगळवारींच पोष्टांत पडला पाहिजे! तुम्हांस कंपॉझीटर मिळत नसतील तर मी आणून देतों.'' ह्यावर रा. गोखले म्हणाले, 'मी तपास केला, परंतु मला मिळत नाहींत.' त्यावर त्यांना ''तुम्हीं जा, मी कंपॉझीटर आणून देतों'' असें सांगून मला सांगितलें कीं, 'मजबरोबर आतांचे आतां गांवांत चला, आज कंपॉझिटर गोळा करून आणावयाचे आहेत.'' मी गांवांत जाऊन टांगा घेऊन येतों म्हणालो. त्यावर ते म्हणाले ''आतां दहा वाजण्यास आले आहेत; तुम्ही गांवांत जाऊन टांगा आणून आपण जाईपर्यंत वेळ होणार. छापखान्याच्या मालकांनीं एकदां आपले कंपॉझिटर लोकांना काम नेमून दिलें म्हणजे मग आपणास माणसें मिळणें कठीण. तेव्हां जेथें टांगा मिळेल तेथें करूं, तेथपर्यंत पायींच जाऊं'' असें म्हणून आम्ही निघालों. त्या दिवशीं बुधवार चौकापर्यंत टांगा मिळाला नाहीं. तेथपर्यंत लंगडत लंगडत ते आले! तेथें टांगा करून आम्ही ४/५ छापखान्यांत जाऊन प्रत्येक ठिकाणाहून एकदोन अशीं माणसें मागून त्या सर्वांस बारा वाजण्यापूर्वी हरिपंताकडे नेऊन कामास लावलें, व त्या दिवशींचा 'केसरी' वेळेवर काढला.

## गोपाळ रावजी गोगटे

(न्यू इं. स्कूलमधील लोकमान्यांचे शिष्य, वकील, भुसावळ)

आर्टिकहोमचें पुस्तक लिहून काढण्याकरितां १९०२ सालचे उन्हाळ्यांत लोकमान्यांनीं मला सिंहगडास नेलें होतें. त्यावेळीं महिना सव्वामहिना त्यांच्या निकट सहवासांत घालविण्याची सुसंधी मला मिळाली. ते यावेळीं सर्व परिवारासह गडावर राहिले होते. पुस्तकप्रकाशनाचें काम थोडें दिरंगाईवर गेलें असें वाटून यावेळीं गडावर पुस्तक लिहिण्याचें काम पुरें करण्याचा निश्चय करूनच ते आले होते. तितकेंच निकडीचें काम असल्याशिवाय कोणी गडावर  येऊं नये अशी खालीं ताकीद होती. गडावर पोंचल्याचे दुसरे दिवशींच सकाळपासून कामास ताबडतोब सुरुवात झाली. मजकूर सांगण्याचा सपाटा चालत असे. कधीं कधीं चौदाचौदा, पंधरापंधरा तास लिहिण्याचें काम चालत असे. हें लिहिण्याचें दालन सोडून ते इकडे तिकडे बहुधा जातच नसत. एखादी नवी कल्पना डोक्यांत आली तर मध्येंच इतकी तंद्री लागे कीं, मी तासचे तास पुढें कागद व हातांत टाक घेऊन तिष्ठत असे. कांहीं मजकूर सांगितला नसतां ''झालं'' म्हणूनच विचारीत. इतके दिवसांत फक्त एकदां सर्वांत धाकट्या चारपाच वर्षांच्या श्रीधरपंतास दोन हातांनीं वर उचलून ''काय रे'' म्हणून पुन्हां लगेच खालीं ठेवलेला मी पाहिला. मुलाबाळांशी संभाषण क्वचितच होत असे. घरांत जेवायचें झालें आहे हें सांगण्यास सुद्धां मुलें भीत असत. कारण हा निरोप म्हणजे कामांत मोठा व्यत्ययच असें त्यांस होई. गडावरून खालीं येण्याचे दिवशीं शेवटच्या भागाचें लिहिणें चाललें होतें तें गडावरून निघण्याच्या शेवटच्या मिनिटापर्यंत पुरवलें. पुस्तक लिहून हाताबाहेर काम पडल्याबद्दल त्यांस समाधान वाटलेंलें दिसलें. या पुस्तकाबद्दल त्यांस एक प्रकारचा सात्त्विक अभिमान वाटत असे. हिंदुस्थानांतील लोकांना अशीं नव्या कल्पनेचीं पुस्तकें चिकित्सक बुद्धीनें लिहितांच येणार नाहींत असा पाश्चात्त्यांस फुकट गर्व वाटतो, असा एखादे वेळीं उद्गार निघे. या पुस्तकाचें खरे महत्त्व व रहस्य समजेल असे पाश्चात्त्यांत तरी सातआठच पंडित आहेत असें त्यांचें मत होतें.

## Babu Aurobindo Ghose

Mr. Tilak was the first political leader to break through the routine of its somewhat academical methods, to bridge the gulf between the present and the past and to restore continuity to the political life of the nation. He developed a language and a spirit, and he used methods, which Indianised the movement and brought into it the masses. To bring in the mass of the people, to found the greatness of the future on the greatness of the past, to infuse Indian politics with Indian religious fervour and spirituality, are the indispensable conditions for a great and powerful political awakening in India. Others– writers, thinkers, spiritual leaders, had seen this truth. Mr. Tilak was the first to bring it into the actual field of practical politics. Nothing can be more significant than the fact that the works which had brought him a fame other than that of the politician and patriot, were done in periods of compulsory cessation from his life-work– planned, and partly if not wholly, executed during the imprisonments which could alone enforce leisure upon this unresting worker for country. Even these by-products of his genius have some reference to the one passion of his life, the renewal, if not the surpassing of the past greatness of the nation by the greatness of its future.

Two facts of his life and character have to be insisted on as of special importance to the country because they

give a great example of two things in which its political life was long deficient. First, the inflexible will of the patriot and man of sincere heart and thorough action which had been the very grain of his character; for aspirations, emotion, enthusiasm are nothing without this; will alone creates and prevails. And wish and will are not the same thing, but divided by a great gulf : the one, which almost of us get to, is a puny, tepid and inefficient thing, and even when most enthusiastic, easily discouraged and turned from its object; the other can be a giant to accomplish and enduse. Secondly, the readiness to sacrifice and face suffering, not needlessly or with a useless bravado, but with a firm courage when it comes, to bear it and to outlive, returning to work with one's scars as if nothing had happened. No prominent man in India has suffered more for his country; none has taken his sacrifices and sufferings more quietly and as a matter of course. Tilak's name stands already for history as a nation-builder, one of the half-dozen greatest political personalities, memorable figures, representative men of the nation in this most critical period of India's destinies, a name to be remembered gratefully so along as the country has pride in its past and hope for its future.

## Subhas Chandra Bose

Towards the end of Jan. 1925, when I was a guest of His Majesty's Government, I was transferred to Mandalay Jail in Upper Burma. Soon after my arrival there, some of the detainees who had preceded me, pointed out the building in which Lok. Tilak had been confined for over five years. The compound within this structure was situated was adjoining ours.

Summer was the longest season. The heat was simply scorching. I have hardly ever experienced such heat in my life. Wet towels wrapped round one's person would dry up in no time. Till mid-night the air would be hot and the place would be so close and stuffy that sleep would be impossible. In the early hours of the morning the temperature would sometimes drop suddenly and would get up in the morning with cold and cough.

I often used to think and wonder how in those circumstances Lokamanya could go in for prolonged intellectual work for over five years. Only one who had attained complete self-mastery, who was altogether indifferent to pleasure and pain and heat and cold could rise above such dismal surroundings. Lokamanya was all-alone in that horrid cage-the only society that he could get was the none too desirable company of the Jail Officials whenever they dropped in. Even the ordinary

prisoners of the jail were not allowed to associate with him. Consequently he would have to be immersed in his books or in his thoughts all the time. What degree of intellectual strain that would mean for the ordinary man, can be easily understood.

Lokamanya was not in the best of his health when he was incarcerated. He was suffering from Diabetes and had to adhere to a very rigid diet. I have heard from the officer who was in charge of the jail at that time that he lived practically on Barley or on wheat.

Mandalay jail was to a political pilgrim like myself a real place of pilgrimage, hallowed by the memories of one of India’s greatest men. That pilgrimage is one of the happiest episodes in my life.

## डॉ. दत्तात्रय विनायक पटवर्धन

(एलएम अँड एस, सुप्रसिद्ध राष्ट्रीय हरिदास, वाई)

एकदां लोकमान्यांच्या दर्शनाकरतां म्हणून वाड्यांत गेलों. श्रीरामनवमीच्या उत्सवाकरतां येथें आलों आहें असें त्यांस सांगितलें. तेव्हां ते म्हणाले, ''बुवा, श्रीरामचरित्र कीर्तनांत तुम्ही कसें सांगतां? राम देव होते असें सांगत जाऊं नका. कारण श्रीरामाचें चरित्र अत्यंत यत्नप्रधान आहे. आमच्या लोकांना असें म्हणण्याची संवय अनेक जन्म हाडींमांसीं खिळून गेली आहे कीं, 'राम देव होते, कृष्ण देव होते, आम्ही काय पामर, आमचे हातून काय होणार!' पण ही दुर्बल विचारसरणी राष्ट्राचा घात करते; म्हणून श्रीरामचंद्राचें चरित्ररहस्य यत्नप्रधान कसें आहे, यावर जोर देऊन तें सांगत चला. 'यत्न तोचि देव' अशीच रामदासस्वामींची शिकवणूक आहे असेंच नेहमीं प्रतिपादित जावें.''

## दत्तात्रय वामन पोतदार

(बी.ए. प्रोफेसर न्यू पूना कॉलेज, इतिहास–सं. मंडळाच चिटणीस,पुणें.)

लो. टिळकांशी निकट सहवास मला कधीं फार लाभलेला नाहीं, त्यामुळें सांगण्याजोग्या आठवणी मजपाशीं नाहींत. एकदां केसरीमार्फत त्यांनीं केलेल्या भाषासेवेसंबंधानें विषय निघाला असतां त्यांनीं या लेखकाजवळ असे उद्गार काढले कीं, ''आमचें धोरण केसरींत इंग्रजी शब्द सहसा येऊं द्यावयाचा नाहीं असें असे. लिहावयाला बसावयाचें आणि निश्चय हा ठेवावयाचा कीं, इंग्रजी शब्द मध्यें न घालतां सारखा मजकूर लिहीत जावयाचा. लेखणी अडली तरी शब्द मराठी करून घातल्याखेरीज पुढें जावयाचें नाहीं. हटूनच बसलें म्हणजे शब्द सुचत व या रीतीनें केसरींत किती नवीन शब्द आणतां आले.''

## पंडित नरदेवशास्त्री

(वेदतीर्थ संपादक 'शंकर,' हरिद्वार)

फिर १९०५ में लोकमान्य के दर्शन कलकत्ते में शिवाजी महोत्सव के अवसर पर हुए। श्री. खापर्डे, डॉ. मुंजे उनके साथ थे। लोकमान्य ने वहाँ बावीस व्याख्यान दिये। वे बंगाल में धूमधाम के दिन थे। सब कोई जानता है बंगाल में 'शिवाजी आया, शिवाजी आया' की धूम थी। एक दिन पर्वीपर लोकमान्य पैदल ही गंगास्नान के लिये गये तब उन के साथ स्नानार्थ जो असंख्य जनसमुदाय था उसीसे उनकी महत्ता प्रतीत होती थी। शिवाजी महोत्सव में श्री. सुरेन्द्रनाथ बैनर्जी व लोकमान्य तिलक जिस प्रकार छाती से छाती लगाकर मिले वह एक देखने योग्य दृश्य था। प्रथम सुरेन्द्रनाथ बैनर्जी ने 'महाराष्ट्र के अभिषिक्त राजा' कहकर स्वागत किया। फिर ए. चौधरी बोले, फिर बा. बिपिनचंन्द्र पाल की गरमागरम वक्तृता हुई। फिर श्री. खापर्डेका विनोदात्मक प्रहसन हुआ। फिर डॉ. मुंजे बोले। एक महाराष्ट्र गायक ने–मैं नाम भूलता हूं–एक स्फूर्तिजनक गीत गाया। फिर लोकमान्य ने कहा–''बंगाल बुद्धि में किसी से कम नहीं, उसको शारीरिक सम्पत्ति प्राप्त करनी चाहिये। देश दासता के रोग में फँसा हुआ है, उसको निकालने के लिये बंगाल कीं बुद्धि, महाराष्ट्र की युक्ति, पञ्जाब का बल, मदरासका व्यापक ज्ञान आदि का मेल आवश्यक है–शिवाजी के चरित्र को स्मरण रखकर वीर बनने का यत्न करो–'' इत्यादि। महाराष्ट्र क्लब में व्याख्यान देते हुए कहा कि ''महाराष्ट्रों को उचित है कि जहाँ जायँ महाराष्ट्र बना कर रहें वे बंगाल से बहुत कूछ सीख सकते हैं और उसको सिखा सकते हैं।'' मारबाड़ी ब्राह्मण सभा के मानपत्र के उत्तर में आपने कहा कि– ''ब्राह्मण विद्या और तप के लिए प्रसिद्ध थे–इसी की रक्षा करना उनका परम धर्म है।''

## गजानन विश्वनाथ केतकर

(लोकमान्यांचे नातू, उपसंपादक केसरी, मराठा)

टिळकांना मधुमेह होता ही गोष्ट वर सांगितलीच आहे. या मधुमेहावर त्यांनीं तुरुंगांत असतांनाच स्वत:वर प्रयोग करून पथ्य शोधून काढलें होतें. मधुमेहांत स्टार्च व साखर हे पदार्थ पोटांत जितके कमी जातील तितके चांगलें. यव म्हणजे सत्तु. या धान्यांत हे पदार्थ कमी प्रमाणांत आहेत म्हणून त्याच्या पुऱ्या तयार करून ते खाऊं लागले व त्यामुळें त्यांस गुण वाटूं लागला. पुढें गव्हांतील ग्लुटीन–म्हणजे पांढरें सत्त्व किंवा स्टार्च काढून शिल्लक राहिलेला भाग–यांत मिसळत असत. याशिवाय दुसरें कोणतेंहि धान्य या पथ्यांत चालत नसे. या पथ्याची लोकांना माहिती व्हावी म्हणून त्यांनीं एक इंग्रजी व मराठी पत्रक छापून काढलें होतें. वर दिलेलें सत्तूचें पथ्य त्यांनीं आठदहा वर्षें सतत पाळलें होतें. पुष्कळ लोकांना हें पथ्य पाळणें फार कष्टतर जाईल. कारण, सत्तु या धान्याला बिलकुल चव नसते. पण टिळक हे जगण्याकरितां जेवत, जेवण्याकरितां जगत नसत, ही गोष्ट त्यांना ज्यांनीं जेवतांना पाहिलें असेल ते सहज सांगूं शकतील. कुठल्याहि पदार्थाची चव किंवा तो चांगला झाला कीं वाईट झाला हें ते जेवतांना सहसा बोलत नसत. जेवतांना ह्याबद्दल विचारलेंच तर त्या पदार्थाचा चवीच्या दृष्टीनें पुन: घांस घेऊन मग सांगत!

# डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे

(राष्ट्रीय पक्षाचे व स्वराज्य पक्षाचे एक प्रमुख पुढारी, नागपूर.)

१९०० सालाची गोष्ट असेल. त्या वर्षी रायगडावर श्रीशिवाजीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर लोकमान्यांच्याच प्रेरणेनें करण्यांत आला होता. तोंपर्यंत मीं टिळकांना पाहिलें नसावें; निदान हेच टिळक म्हणून ओळखत नसे. रायगडावर एक दिवस सकाळीं दहाच्या सुमारास आम्ही गंगासागर तळ्यावर स्नानास गेलों. पोहतां येत होतें म्हणून पोहण्याच्या नादांत होतों. इतक्यांत टिळक तेथें स्नानास आले. त्या वेळेस रा. तात्यासाहेब केळकर हे स्नान करून लाल सोवळें नेसून डोक्यावर छत्री धरून पाण्याजवळ घाटावर उभे होते. लोकमान्य स्नान करूं लागले. तेव्हां त्यांचें लक्ष आम्ही पोहत असतांना आमच्याकडे गेलें. त्यांनीं आमच्यासंबंधीं विचारपूस केली व टिळक आले असें कळतांच आम्हीहि तीरावर टिळकांजवळ आलों. त्यांनीं आम्हांस आमच्या पोहण्याविषयीं विचारलें. टिळक आम्हांस म्हणाले, ही नरसोपंतांची छत्री दोनहि हातांत धरून केवळ पायानें पोहत या तळ्याचे पार जावें. आम्ही तसा प्रयत्न केला; पण मध्यांतूनच परत आलों, पार जाऊ शकलों नाहीं. नंतर लोकमान्यांनीं ती छत्री आपल्या दोनहि हातांत धरून केवळ पायानें पोहत परतीरास गेले आणि परत आले. आम्ही हें पाहून थक्क झालों. पूर्वीपासूनच त्यांच्याविषयीं आदर, अभिमान व स्नेह आमच्यांत होताच; परंतु हें पाहून आमच्या मनांत आश्चर्य व प्रेमाचें भरतें आलें.

## सदाशिव विनायक बापट

(संपादक, लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका)

१९२० सालीं लोकमान्य विलायतेहून परत आल्यावर मुंबईसच सरदारगृहांत एके दिवशीं रात्रीं मीं त्यांस विचारले, 'विलायतेस ज्या दिवशीं चिरोल केसचा निकाल झाला त्या दिवशीं तुम्हांस वाईट वाटून किती तरी दु:ख झालें असेल नाहीं?' प्रशांतपणें व माझी समजूत पटेल अशा रीतीनें ते मला म्हणाले, 'अरे, दु:ख म्हणजे काय? प्रतिकूलसंवेदनोत्पादकं दु:खम् असें म्हणतात. पण ज्यानें अभ्यासानें व विवेकानें मुळांत नि:संवेदित्वच जेथें प्राप्त करून घेतलें तेथें मग आतां दु:ख कसलें? दु:खाचें बीजच जर उपटलें तर तेथें अंकुर फुटणार कसा? अपेक्षा, आसक्ति व कर्तव्यच्युति यांत दु:ख आहे; तरी पण तुम्ही ज्या कल्पनेनें दु:खाकडे पाहतां ती कल्पनाच मुळीं आम्ही निर्मूल केलेली आहे.' I make my mind quite vacant and allow it complete rest.' मन निर्विकार करून तें जितका अधिक काल या स्थितींत ठेवावें तितकी अधिक शांति व प्रसन्नता मनास प्राप्त होते. कारण हा एक प्रकारचा योगच आहे, व त्यास मुख्य एकाग्र चित्तत्वाची (कॉन्सेन्ट्रेशन) अत्यंत जरूर आहे. त्याशिवाय हें कांहीं साधणार नाहीं!

मीं त्यास विचारलें, 'तुम्ही, बिछान्यावर पडतांच तुम्हांस चटकन झोंप रोज कशी येते?' ते एकदम म्हणाले, 'That is due to my concentration. तुम्हाला ऐकून कदाचित् खरेंहि वाटणार नाहीं–अगदींच आश्चर्य वाटेल कीं, मला गेल्या वीस वर्षांत स्वप्न म्हणून कधीं पडलें आहे असें मला आठवत नाहीं. मंडालेस असतांना सतत एकसारखें कित्येक दिवस मी Mind vacant–मन निर्विकार–ठेवण्याचा अभ्यास वाढविल्यानें भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें मनुष्य सुखदु:खातीत कसा असूं शकतो याची मला कल्पना येते.

# नारायण सदाशिव मराठे

(धर्म आणि राजकारण यांचा मेळ घालू इच्छिणारे एक ब्रह्मचारी)

राजकारणी पुरुषाचे आंगीं काय काय गुण लागतात याविषयीं लोकमान्यांचे तोंडून जो उपदेश ऐकावयास मिळाला त्यांपैकीं कांहीं खालीं देत आहे:–

राजकारणी पुढाऱ्याचे आंगांत दोन गुण असावे लागतात. एक तर त्यांच्या हृदयांत प्रखर आग पेटलेली पाहिजे, व दुसरा म्हणजे त्या हृदयाच्या वरच्या बाजूस डोकें बर्फासारखें थंड असलें पाहिजे. हे दोनहि गुण एकसमयावच्छेदेंकरून नेहमीं ज्या पुरुषाजवळ उत्कटतेनें वास करीत असतील तो पुढारी होण्यास योग्य होय.

राजकारण हा विषय विकारांच्या तीव्रतेनें मनाला भ्रष्ट करणारा आहे. तें मन समतोल व शांत राखण्याकरितां दररोज किंवा वेळ न मिळाल्यास निदान दर तीनचार दिवसांनीं तरी घटका दोन घटका नेहमींच्या सर्व व्यापारांपासून मन अगदीं अलग करून शक्य तितकें एकाग्र व शांत ठेवण्याचा परिपाठ असावा. या योगें अनेक प्रमादांपासून बचाव होऊन चित्तशुद्धि राहते.

आपण जी राजकीय चळवळ करूं तींत अपयश आलें असतां ती सहज क्रमप्राप्त गोष्ट आहे अशी मनाची वृत्ति राहिली पाहिजे. यश येणार नाहीं असें धरूनच चाललें पाहिजे. माझ्या २५-३० वर्षांच्या अनुभवांत अपयश इतकें आंगवळणीं पडून गेलें आहे कीं, यापुढें जर कांहीं चमत्कार होऊन सरकारनें माझ्या खटपटीस यश देण्याचें धोरण सुरू केलें तर मला अगदीं चुकल्याचुकल्यासारखें वाटेल.

## दाजी नागेश आपटे

...कोणतेही गंभीर विषयावरचे नवीन पुस्तक बाहेर पडताच ते आणून फारच अल्प वेळात वाचून पार करीत. एकदा 'रशियातील राज्यक्रांतीचे प्रयत्न' या नावाचे एक सातशे-आठशे पानांचे पुस्तक त्यांनी सुरुवात केल्यापासून एकदीड कलाकात पुरे केले. मला वाटले, की त्यांनी ते वरवर उडत उडत पाहिले असेल. त्यावरून त्यासंबंधी मी त्यांना लगेच विचारता त्यांनी मला सांगितले, 'मी ते पुस्तक संपूर्ण वाचले!' एवढेच बोलून ते स्वस्थ बसले नाहीत? तर त्यांतील मजकुराची रूपरेषा त्यांनी मला सांगून 'अमक्या एक प्रकारचा मजकूर अमक्या पानाच्या मध्याच्या सुमारास आहे, काढून पाहा' असे मला सांगितले. मी त्याप्रमाणे पाहताच खरोखर अगदी त्याच सुमारास तो आढळला. यावरून 'इतके सूक्ष्म कसे सांगता आले?' असा प्रश्न मी करताच ते म्हणाले, 'यात आश्चर्य करण्यासारखे काही नाही. पुष्कळ वाचनाने व मननाने साधारणत: कोणत्याहि प्रश्नाचे विवेचन ग्रंथकार अमुक तऱ्हेने करतो आहे हे समजू शकते. मग त्या ग्रंथकाराची ही दिशा व धोरण समजले म्हणजे त्या विचाराच्या साखळीतील सगळेच दुवे स्वत: पाहावे लागत नाहीत, ते तर्काने ताडता येतात व तर्क अनेक वेळा चालविल्याने त्यात कौशल्य येते.'

## डॉ. मोतीराम बाळकृष्ण वेलकर
(लोकमान्यांचे मुंबईतील एक प्रमुख सहकारी)

बोलण्याच्या ओघांत मजुरांच्या चळवळी (Labour Movements) कडे ते वळले आणि म्हणाले, ''डॉक्टरसाहेब, येथील मजुरांची चळवळ पाहून व मजुरांच्या संघापुढें भाषणें करून परत हिंदुस्थानांत गेल्यावर अशाच चळवळी आपल्या देशामध्यें सुरूं झाल्या पाहिजेत, असें तुम्हाला वाटणें साहजिक आहे. परंतु आपल्या देशपरिस्थित्यनुरूप आपण या चळवळीला हात घातला पाहिजे. पाश्चात्य देशांप्रमाणें माझ्या देशांतील मजूर व भांडवलवाले ह्यांच्यामध्यें मला तेढ उत्पन्न करावयाची नाहीं. ज्या देशांमध्यें शिकलेल्यासवरलेल्या कारकुनाला दरमहा रु. १० ते २० पर्यंत पगार मिळतो, त्या देशांत रोजीं दोन किंवा तीन रुपये मिळाले पाहिजेत म्हणून मजुरांना चळवळ करावयास लावणें हा वेडेपणा होय. मला मजुरांची संघटना व्हावयास पाहिजे, परंतु ती Social welfareच्या पायावर व्हावयास पाहिजे. त्यासाठीं Employment–Insurance, Hospitals, Entertainment–rooms, Saving and co-operative credit societies आणि आधुनिक पद्धतीवर पुराणें स्थापण्याकडे मी मजुरवर्गाचें चित्त खेचून घेईन. १९०६ व १९०७ सालीं मजूरवर्गामध्यें फैलावत असलेल्या दारूच्या व्यसनापासून त्यांना परावृत्त करण्यासाठी मद्यपाननिषेधाची मोठी चवळ मीं महाराष्ट्रभर केली; परंतु सरकारकडून ह्या चळवळीला अडथळा करण्यांत आला. मजूर लोकांची स्थिति सुधारावी अशी माझी फार इच्छा आहे. मुंबईत मजुरांच्या एका सभेंत, भाषणाच्या अगदीं सुरुवातीस मी असें उद्गारलेलें मला आठवतें कीं, 'मुंबई मजूर लोकांची आहे.' आपलीं कोंकणांतील घरेंदारें सोडून मुंबईत येऊन राहणाऱ्या मजुरांच्या श्रमावर मुंबईची श्रीमंती अवलंबून आहे.''

## विश्वनाथ गंगाधर केतकर

(लोकमान्यांचे जावई)

सन १८९७–९८ सालांतील तुरुंगवासाचे वेळीं, लोकमान्यांचा विद्याव्यासंग जाणून प्रो. मॅक्समुल्लर यांनीं आपला ऋग्वेदाचा ग्रंथ लोकमान्यांकडे तुरुंगाचे अधिकाऱ्यामार्फत पाठविला. ऋग्वेदाचा ग्रंथ हातीं आल्यावर तुरुंगांत त्यांनीं तो ग्रंथ दोनदां वाचला, व तो वाचीत असतांनाच कांहीं ऋचांवरून आर्यांचें मूल वसतिस्थान, ज्या प्रदेशांत रात्र व दिवस मोठे असतात अशा प्रदेशांत असलें पाहिजे ही कल्पना त्यांस आली. विशेषत: ''सूर्योदयात् प्राक्बहूनि अहानि आसन्' (सूर्योदयापूर्वी पुष्कळ दिवस गेले) या ऋचेने त्यांच्या कल्पनेस दृढता आली. तुरुंगांतून सुटून आल्यानंतर या विषयासंबंधानें माझ्या समक्ष एका विद्वान मित्राशीं बोलतांना ते म्हणाले, ''ज्या रात्रीं 'सूर्योदयात् प्राक्बहूनि आसन' या ऋचेचा अर्थ बरोबर लागला ती रात्र मला फार आनंदाची गेली.'' यावर त्यांचे मित्र साहजिक म्हणाले, ''अहो, तुरुंगांत कसला आला आहे आनंद?'' लोकमान्यांनीं उत्तर दिलें, ''तो आनंद कसा असतो हें तुरुंगांत गेल्याखेरीज तुम्हांस समजणार नाहीं!''

## गोविंद कृष्ण टिळक

(वकील, लोकमान्यांचे एक शिष्य व अभिमानी, बार्शी.)

सन १८८६ सालीं फर्ग्युसन कॉलेजांत प्रोफेसर म्हणून शिकवितांना टिळक यांस मीं पाहिलें. संस्कृत मेघदूत काव्य ते शिकवीत. त्यांत श्लोकांचें गोड भाषांतर करून देण्यापेक्षां मुख्यत: ग्रंथाचें रहस्य व काव्याची महति कशांत आहे हें समजावून देण्याकडे त्यांचा विशेष कटाक्ष असे. दुसरा विषय बीजगणित ते शिकवीत. त्यांत विषयाचें पृथक्करण करून उपपत्ति सुलभ करून दाखविण्यांत त्यांचा हातखंडा असे. या गणिती प्रोफेसरास अडविण्याकरितां बुद्धिवान् विद्यार्थ्यांनीं नाना प्रकारच्या बिकट शंका विचारून आपली शिकस्त करून पाहावी, परंतु व्यर्थ. टिळकांनीं उदाहरणांतील निरनिराळ्या टप्प्यांचा (Steps) तोंडानेंच फडशा पाडावा, व क्षणांत उत्तर आणून देऊन सर्व वर्गास चकित करावें!

❖ ❖ ❖

टिळकांनी खटल्याचा तिसऱ्या दिवशी (ता. १५ जुलै) आपल्या बचावाच्या भाषणाला सुरुवात केली व आठव्या दिवशी ता. २२ रोजी थोडेसे बोलून आपले भाषण संपविले. या सहा दिवसांत उणेपुरे एकवीस तास दहा मिनिटे त्यांचे भाषण चालू होते. कारण फिर्यादीच्या दुसऱ्या भाषणाला उत्तर देण्याची कायद्याप्रमाणे टिळकांना सवड नव्हती, म्हणून तो काय मुद्दे काढील याचा अंदाज करून त्याचे अगाऊ खंडन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर पडली आणि ती त्यांनी प्रकृती ठीक नसताही रेटून नेली. चुकीची भाषांतरे, त्यातले नेमके आक्षेपार्ह काय त्याचा पत्ता नाही, सर्व आरोपांची सुनावणी एकत्र, मराठीचे ज्ञान नसलेली ज्यूरी, या टिळकांच्या अडचणी होत्या.

–'लोकमान्य' या श्री. न. र. फाटक यांच्या चरित्रग्रंथांतून

# विश्वनाथ गंगाधर केतकर

(लोकमान्यांचे जावई)

१९०२–३ सालीं गांवांत प्लेग असल्यानें लोकमान्य फर्ग्युसन कॉलेजाजवळ परांजपे यांचे पडळीचे जागेंत झोंपडींत राहत होते. त्या ठिकाणींहि प्लेगचा प्रादुर्भाव होऊन लोकमान्यांवर कौटुंबिक आपत्ति आली व त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव विश्वनाथपंत हे प्लेगला बळी पडले. विश्वनाथपंत हे त्या वेळीं फर्ग्युसन कॉलेजमध्यें विद्यार्थी होते. एकाच आठवड्यांत चुलतभाऊ, भाचा व वडील मुलगा प्लेगला बळी पडल्यानें त्यांचे मनावर परिणाम झाला असेल याची कल्पनाच करणें बरें. विश्वनाथपंत वारले त्याच दिवशीं प्रस्तुत लेखक पुण्यास लोकमान्यांकडे गेला होता. झोंपडीकडे जाण्यापूर्वीच ही दु:खद वार्ता समजल्यानें लोकमान्यांच्या खासगी तंबूंत जाऊन त्यांचें सांत्वन कसें करावें व काय बोलावें या विचारानें त्या वेळीं तोंडांतून शब्दहि निघाला नाहीं. लोकमान्यांनीं आंत हांक मारून बोलावलें व ते म्हणाले, 'अहो, गांवची होळी पेटल्यावर प्रत्येक घरच्या गोवऱ्या जाव्या लागतात, त्याप्रमाणेंच झालें.' पुत्रवियोगामुळें त्यांस अत्यंत दु:ख झालें ही गोष्ट साहजिकच होती; परंतु अशा प्रसंगींहि त्यांची वृत्ती कशी असे हें यावरून कोणाच्याहि लक्षांत येण्यासारखें आहे.

# सदाशिव विनायक बापट

(संपादक, लो. टिळक यांच्या आठवणी आणि आख्यायिका)

लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर श्रीमंत अण्णासाहेब व लोकमान्य एकदां अगदीं खाजगी सुखदु:खाच्या गोष्टी बोलत असतां अण्णासाहेब त्यांस म्हणतात, ''आपण येथें नसतांना, आपले पश्चात् आपलें कुटुंब कैलासवासी झालें, याबद्दल त्या वेळीं मला किती दु:ख झालें म्हणून सांगूं? आपणास तर ती बातमी कळल्यावर काय वाटलें असेल याची कल्पना होत नाही.'' किंचित् संकोचित मुद्रेनें लोकमान्य म्हणतात, ''तुम्ही आतां विचारतांच म्हणून सांगतों. मूळ माझे स्वभावांत भावना कमी आहे असें नाही; पण अनुकूल संवेदनेनें हर्षातिशय अगर प्रतिकूल संवेदनेनें शोकातिशय असें मला कधींच होत नाही. याचा अर्थ असा नाहीं कीं, मी सुखदु:खातीत आहे. पण त्याहिबरोबर हेंहि खरें कीं, गीता व वेदान्त यांच्या मननानें व चिंतनानें विकारांचा क्षय होतो हा माझा अनुभव आहे.''

❖ ❖ ❖

टिळकांच्या राजकारणात हिंदुस्थानाशेजारच्या चीन, अफगाणिस्थान, नेपाळ या देशांतून येथील ब्रिटिश राज्यकारभारावर दडपण येऊन त्याचा फायदा हिंदी राजकीय चळवळीला मिळावा, असा एक उद्देश होता. त्या उद्देशानुसार जमेल तशी खटपट करण्यासाठी त्यांनी आपल्या विश्वासाचे तीन गृहस्थ एकेका देशात पाठविले. त्यांतल्या एकाचे अफगाणिस्थान हुकले. त्याला तेथे प्रवेशच मिळाला नाही. चीनमध्ये थोडा प्रयत्न दुसऱ्याने करून पाहिला, तोही वाया गेला. हत्यारांचा कारखाना काढण्याला कृ. प्र. खाडिलकर नेपाळात गेले होते, हे आता गुपित राहिलेले नाही. नेपाळच्या कारखान्याच्या वाटणीस ब्रिटिशांच्या जागरूकतेमुळे खाडिलकरांपुरते अपयशच आले. ही खटपट १९०२ ते १९०५ या तीन वर्षांतली होती.

'लोकमान्य' या श्री. न. र. फाटक लिखित चरित्रग्रंथातून

# गजानन विश्वनाथ केतकर

(लोकमान्यांचे नातू)

या सहा वर्षांच्या काळांत रामभाऊ, बापू व मी इंग्रजी शाळेंत गेलों होतों. दादांचीं तुरुंगांतून पत्रें येत. तीं पुण्याहून ती. बाबा विद्वांस नाशिकला पाठवीत व मी आईला वाचून दाखवीत असे. तुरुंगाच्या नियमाप्रमाणें अर्थात् ही सर्व पत्रें इंग्रजी असत, व त्यांत राजकीय स्वरूपाचा कांहीं मजकूर नसे. दरमहिन्यास एक पत्र येत असे. त्यांतही मुलांच्या अभ्यासाची दादा अतिशय काळजी घेत. कवडेशास्त्री हे मुलांना संस्कृत शिकविण्यास होते व महाजन म्हणून दुसरे एक मास्तर इंग्रजी शिकविण्यास येत. या मास्तरांनाही कशा पद्धतीनें शिक्षण द्यावयाचें यासंबंधीं पत्रांतून नेहमीं सूचना येत. मुख्यत्वें व्यायामासंबंधीं पत्रांतून नेहमीं सूचना येत. व्यायामासंबंधींहि रोज किती जोर बैठका काढतात याची ते चौकशी करीत. मुलांनीं साध्या राहणीनें वागावें यावरहि त्यांचा कटाक्ष असे. इतका कीं, सायकल वापरणें किंवा चष्मा लावणें याचाहि त्यांनी निषेध केला होता! सहा वर्षांत ती. बाबा, दोनतीन वेळां, माझे वडील ती. आप्पासाहेब हे एक वेळ व मुलें एक वेळ मंडालेस भेटण्यास गेलीं होतीं, मुलांना बरोबर आपल्या अभ्यासाच्या वह्या घेऊन बोलाविलें होतें व त्यांनीं तेथें त्यांस निरनिराळ्या विषयांवर प्रश्न विचारून चांचणी घेतली होती. मॅट्रिकच्या परीक्षेची तयारी कशी करावयाची याबद्दल विषयवार व विस्तृत सूचना त्यांनीं पाठविल्या होत्या.

# ब्रह्मगिरीबुवा

विधायक कार्याचें लोकमान्यांस वावडें होतें, असा मवाळांचा त्यांच्यावर आक्षेप आहे; पण पुण्यास प्लेगमुळें कहर गुदरला, त्या वेळीं टिळकांनीं हिंदु-हॉस्पिटल स्थापन केलें. तेथें व्यवस्था पाहाण्यास टिळक सांजसकाळ जात असत. एके दिवशीं एक विधवा बाई प्लेगच्या दुखण्यांतून बरी होऊन आमच्या त्या दवाखान्यांतून गांवांत परत जावयाची होती. तिचें तेथील बील सुमारें ३० रुपये झालें होतें; पण तिचेजवळ मुळींच पैसे नव्हते. हॉस्पिटलमधील अधिकारी, तेथील नियमाप्रमाणें, तिचेकडून पैसे घेतल्याशिवाय तिला सोडीनात. इतक्यांत लांबून गाडींतून श्रीमंत बाळासाहेब नातू यांचेसह येत असलेल्या लोकमान्यांस तिनें पाहिलें. संकटसमयीं अचानक रीतीनें अवतीर्ण होऊन द्रौपदीस सहाय्य करणाऱ्या श्रीकृष्णाची तिला आठवण झाली. आपणांसहि तोच अनुभव आतां येत असल्याचें तेथील सर्व मंडळीदेखत निं सद्गदित कंठानें बोलूनहि दाखविलें! इतक्यांत लोकमान्य तेथें आले. त्यांनीं सर्व प्रकार ऐकून घेतला. लोकमान्यांनी तेथील अधिकाऱ्यास असें सांगितलें कीं, ‘‘या बाईंच्या बिलाचे सर्व पैसे माझे खात्यावर टाकून यांना येथून जाण्याचा पास द्या व त्या अशक्त झाल्यामुळें गाडींतून त्यांस त्यांचे घरी पोंचते करा.

## श्री. गजानन विश्वनाथ केतकर

(लोकमान्यांचे नातू, उपसंपादक : केसरी, मराठा)

### लोकमान्यांच्या शेवटच्या आजारातील एक आठवण

रात्री व दुपारी बेशुद्धीत ते पुष्कळच बोलत असत. कधी संभाषणासारखे, तर कधी व्याख्यानाच्या आवाजात, व्याख्यान दिल्यासारखे बोलत. त्यांची सर्वच वाक्ये लक्षात राहणे अशक्य आहे. सर्वसाधारणरीत्या एवढे सांगता येईल की, या चार दिवसांत खासगी सांसारिक गोष्टीविषयी ते एक शब्दही बोलले नाहीत. त्यांच्या डोक्यात सर्व सार्वजनिक गोष्टीच घोळत होत्या. अंतकालच्या बेशुद्धीतसुद्धा आपल्या अंगीकृत कार्याशिवाय इतर कोणतीहि गोष्ट मनात न येणे ही कर्मयोगातल्या समाधीची पराकाष्ठा होय. आम्हांस जी वाक्ये कळली ती यापुढे दिली आहेत :

ता. २८ जुलै रोजी रात्रौ–

''१८१८ सालीं असें झालें–परवां हे १९१८ साल आलें–A hundred year's history आम्ही हे असे हीन झालों.''

''पंजाब Matter मध्यें तुम्ही काय करणार? पटेल यांस तार केली काय? आम्ही Special काँग्रेस भरवणार आहोंत.''

ता. २९ जुलै रात्रौ १ वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत–

''माझी अशी खात्री आहे आणि आपणही विश्वास बाळगा कीं, हिंदुस्थानाला स्वराज्य मिळाल्याखेरीज तरणोपाय नाही.''

रात्रौ २ वाजतां व्याख्यानाच्या भाषेंत–

''आपण व जनता यांनीं जे परिश्रम केले त्याबद्दल मी आपले आभार मानतों.''

ता. ३० पुढें त्यांचें बोलणें अस्पष्ट होऊ लागले व ते अगदी जवळच्या माणसास देखील समजेनासे झाले. ते शेवटपर्यंत शुद्धीवर आले नाहीत. मरणसमयी त्यांची मुद्रा अत्यंत शांत होती.

## बॅ. विनायक दामोदर सावरकर

अंदमानाच्या कारागृह्रांत असतांना लोकमान्य वारल्याची बातमी आली. प्रथम उडत उडत रात्रीं कळली. सकाळीं निश्चित झाली. त्या वेळीं लोकमान्यांच्या मृत्यूविषयीं आत्मा तळमळूं लागला. ती तळमळ व्यक्त तरी कशी करणार? अंती आठ वाजण्याचे संधीस निश्चय ठरला कीं, त्या दिवशीं सर्व अंदमानभर सर्वांनीं उपवास पाळावा. तत्काळ आमच्या संस्थेंतील सहकारी मंडळींना मी तें कळविलें. त्यांनीं पुढच्यांस, त्यांनीं त्या पुढच्यांस असें करतां करतां एखाद्या तारेच्या गतीनें ती वार्ता पसरली आणि जेवणाचे वेळेस बसतात तों कारागारापासून तों दूर रासबेटापर्यंत आणि इतर भागांतून शेंकडों लोकांनीं आपापलीं जेवणें घेण्याचें नाकारलें! अधिकाऱ्यास घोटाळा पडला, हें काय? पण कोणी कारण सांगेना. कारण लोकमान्यांचे मृत्यूसाठीं दु:ख वाटण्याचा बंदिवानास अधिकार नव्हता. त्यासाठीं जेवण सोडलें म्हणून म्हटलें तर त्वरित राजद्रोह्यांशीं संबंध ठेवल्याचा खटला आणि बेडी! हळूहळू आपण होऊन अधिकाऱ्यांस कळलें कीं, लोकमान्यांसाठीं हे हजारों बंदिवान आज उपवास आचरीत आहेत. एकदोन तासांत ही बातमी चोहोंकडे पसरून संघटित उपवास हजारों बंदिवानांनीं केला कसा, याचें अधिकाऱ्यांस सक्रोध आश्चर्य वाटलें, आणि तें आश्चर्य होतेंहि. नऊ वर्षांपूर्वी टिळकांचें नांव माहीत असणारा जेथें शेंकडा एकहि असता नसता आणि राष्ट्रीय दु:खासाठीं एक दिवस उपवास करून रिकाम्या पोटीं दिवसभर राबत ते कठोर परिश्रम करण्याइतका राष्ट्रीय वळणाचा मनुष्य तर हजारांत एकच मिळता, त्याच अंदमानांत आठनऊ वर्षांच्या प्रचारानें इतकी संघटना झाली आणि राजकीय चळवळ इतकी उत्पन्न झाली कीं, हजारों बंदिवान एकमतानें राष्ट्रीय दु:ख पाळूं शकत.

## हेन्री नेव्हिन्सन

(ब्रिटिश पत्रकार, उदारमतवादी पक्ष)

लोकांचें टिळकांवर व्यक्तिश: नेहमीं इतकें प्रेम कां? ते त्यांच्यावर काय मोहिनी टाकूं शकतात? हें मला आतां कळून आलें. आणि ते मर्म दुसरें तिसरें कांहीं नाहीं. तर हेंच कीं त्यांच्या स्वभावांत चलबिचल नाहीं. करूं कीं न करूं, करूं कीं न करूं असें नाहीं. केलें पण अर्धवट कांहीं तरी कांहीं तरी केलें असेंहि नाहीं. समरांगण हें त्यांना आनंदभुवन वाटतें. आणि स्वत:ला केव्हां कशानें कांहीं घात होईल इजा पोंचेल असला भीतीचा विचार त्यांच्या मनांत कधींहि येत नाहीं. त्याग किंवा दु:ख या बाबतींत हा मनुष्य नुसता बेभान आहे. पण नुसत्या एवढ्या गुणानें कां समाज कोणाला वश होत असतो? हे वर सांगितलेले गुण तर टिळकांत आहेतच. पण त्यांच्या जोडीला टिळकांच्या अंगीं दुसरेहि गुण आहेत. खेड्यांतल्या अगदीं दरिद्री हीनदीनापर्यंत सर्वांचा परिचय ते करतात व परामर्श घेतात. धर्मश्रद्धा, सामाजिक चालीरीति या बाबतींत जनतेला जें जें मनानें परमप्रिय त्या सर्वांचें ते सतत सुसंगत समर्थन करतात. इतके गुण अंगीं असल्यावर लोकांवर त्यांचें वजन पडावें, त्यांना लोकप्रियता लाभावी यांत आश्चर्य तें कसलें?

–न. चिं. केळकरकृत लो. टिळक चरित्रातून